ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख ३ ऑगस्ट, १९६० | अंक ३०

## विविध माहिती

**नागपूर भागांतील रस्ते**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत नागपूर विभागांत नवे रस्ते व पूल ह्यासारख्या कामास नऊ कोटी रुपये खर्च करण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. राज्याच्या विधिमंडळाचें नोव्हेंबरमधील अधिवेशन नागपूर येथें भरविण्यांत येणार आहे.

**भारत-तिबेट व्यापार**—भारत व तिबेट ह्यांच्यांत होणाऱ्या व्यापाराचा हंगाम नुकताच सुरू झाला आहे. उत्तर प्रदेशांतील पिठोरगड जिल्ह्याच्या सरहद्दीवरून भारतामधील व्यापाऱ्यांची एक तुकडी नेहमींप्रमाणें पश्चिम तिबेटकडे जाण्यास निघाली आहे. सुमारें ३०० ते ४०० व्यापाऱ्यांच्या ह्या तुकडीनें भरपूर माल बरोबर घेतला आहे.

**विमानाच्या स्वरूपांत बदल**—एअर इंडिया इंटरनॅशनलच्या दोन सुपर-कॉन्टेलेशन विमानांचें मालवहातुकीच्या विमानांत रूपांतर करण्यांत येत आहे. एक विमान योग्य तो बदल करण्यासाठी ऑंटेरिओ येथें पूर्वींच गेलें असून दुसरेंहि नुकतेंच गेलें आहे. रूपांतरित विमानांमुळें ब्रिटन व भारत ह्यांच्यामधील मालाची ने-आण बरीच वाढेल.

**गुजरातमध्यें कोळशाचा शोध**—गुजरात सरकारनें राज्यांतील कोळशाचे साठे शोधून काढण्यासाठीं बरीच रक्कम मंजूर केली आहे. झालवाड जिल्ह्यांतील कोळशाचा शोध मध्यंतरीं बंद पडला होता, तो आतां पुन्हा चालू करण्यांत येणार आहे. कांहीं वर्षांपूर्वीं जर्मन तज्ज्ञांनीं केलेल्या शोधांत सौराष्ट्रांत कोळसा असल्याचें आढळून आलें होतें.

**यंत्रांच्या साह्यानें दूध काढणार**—मुंबई जवळील आरे दूधवाडींत यंत्रांच्या साह्यानें दुभत्या जनावरांचें दूध काढण्यांत येणार आहे. ह्यासंबंधीं करण्यांत आलेला प्रयोग यशस्वी झाला आहे. सध्यां दूधवाडींतील १५,००० गुरांची धार काढण्यासाठी १,२०० माणसें लागतात. यंत्रांची योजना झाल्यावर हेंच काम ३५० माणसें करूं शकतील.

**दिल्लीमधील अनधिकृत इमारती**—दिल्ली शहरांत आलेल्या कांहीं निर्वासितांनीं अनधिकृत रीत्या बऱ्याच इमारती बांधलेल्या आहेत, ह्यांपैकी पुष्कळ इमारती म्युनिसिपालिटीचे व नगरयोजनेचे नियम धाब्यावर बसवून उभारण्यांत आल्या आहेत. अशा इमारतींची तपासणी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक मंडळ नेमलें आहे.

**ओरिसा सरकारचें कर्ज**—ओरिसा राज्याच्या अर्थमंत्र्यांनीं आपल्या अंदाजपत्रकाच्या भाषणांत कांहीं विकासकार्यासाठी सार्वजनिक रीत्या कर्ज उभारण्याचें जाहीर केलें होत. त्याप्रमाणें ओरिसाच्या सरकारनें खुल्या नाणेबाजारांत ४ कोटी रुपये कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे.

**टोमॅटो टिकविण्याचा कारखाना**—अकोला तालुक्यांतील टोमॅटो पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनीं टोमॅटो व त्याचा रस टिकविण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्याचे भांडवल ५०,००० रुपये असेल. महाराष्ट्र सरकार कारखान्याचे ३०,००० रुपयांचे शेअर्स घेऊन शिवाय एक लाख रुपयांचें कर्ज देणार आहे.

**जुन्या पोलादाचा उपयोग**—जुन्या रेल्वे वॅगन्सचा उपयोग करून बांधकामांत लागणारें पोलाद तयार करण्याचा प्रयोग माटुंगा येथील रेल्वेच्या कारखान्यांत हातीं घेण्यांत आला आहे. अशा तऱ्हेनें २५ टन पोलाद निर्माण करण्यांत आलें आहे. ह्या पद्धतीनें पोलादाच्या उत्पादनाची किंमत दर टनामागें १,२०० रुपयांऐवजीं ५०० रुपयांपर्यंत खाली आली आहे.

**पृथ्वीचें वजन वाढत आहे**—कोपेनहेगन येथें खगोल शास्त्रज्ञांची व भूगर्भशास्त्रज्ञांची आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. ह्या परिषदेला १५ देशांतून १५० शास्त्रज्ञ आले होते. परिषदेला आलेल्या एका अमेरिकन शास्त्रज्ञानें असा दावा केला आहे कीं आकाशांतून पडणाऱ्या उल्कांमुळें पृथ्वीचें वजन रोज १०,००० टनांनीं वाढत आहे. ह्या सिद्धांताला एका ब्रिटिश शास्त्रज्ञाचाहि पाठिंबा आहे.

**चीन क्यूबाची साखर घेणार**—येत्या पांच वर्षांत चीन क्यूबाकडून दरसाल ५ लाख टन साखर आयात करणार आहे. ह्यासंबंधी ऐनजिनसी अदलाबदलीचा करार नुकताच करण्यांत आला आहे. कराराच्या पहिल्या वर्षांत चीन साखरेच्या किंमतीपैकीं २५ टक्के किंमत पौंडांत देणार असून बाकीची मालाच्या स्वरूपांत देणार आहे.

**आसाममधून आलेले निर्वासित**—आसाम राज्यांत आसामी भाषा राज्यभाषा करण्याच्या प्रस्तावावरून दंगली झाल्या. दंगलींत बिगर-आसामी म्हणजे विशेषतः बंगाली लोकांवर हल्ले करण्यांत आले. दंगलीमुळें भयग्रस्त होऊन सुमारें १०,००० निर्वासितांनीं पश्चिम बंगाल्यांत प्रवेश केला. अजूनहि निर्वासितांच्या तुकड्या येतच आहेत.

**कांगोमध्यें रोगराईचा संभव**—आफ्रिकेंतील कांगो वसाहत बेल्जमपासून स्वतंत्र झाल्यानंतर तेथील बेल्जिअन नागरिकांवर हल्ले होऊं लागले. ह्या हल्ल्यांतून डॉक्टर व नर्सेसहि वगळले गेले नाहींत. अशा परिस्थितीमुळें डॉक्टर्सना आपलें काम करतां येणें अशक्य होऊं लागलें आहे. त्याचा परिणाम म्हणून रोगराई पसरण्याचा धोका उत्पन्न झाला आहे.

## चलनाच्या उतरलेल्या किंमती

### १९४९=१००; १९५४ व १९५९ मधील किंमतीचे इंडेक्स नंबर आणि उतरणीचें वार्षिक प्रमाण

| | चलनाच्या किंमतीचा इंडेक्स नं. | | उतरणीचें वार्षिक प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|
| | १९५४ | १९५९ | १९४९-५४ | १९५४-५९ | १९४९-५९ |
| स्वित्झरलंड | ९४ | ९० | १.२% | १.०% | १.१% |
| जर्मनी | ९९ | ८८ | ०.२ | २.२ | १.२ |
| बेल्जम | ९१ | ८१ | २.० | १.७ | १.८ |
| पाकिस्तान | ९० | ८३ | २.० | १.६ | १.८ |
| भारत | ९९ | ८२ | ०.१ | ३.७ | १.९ |
| अमेरिका | ८९ | ८२ | २.३ | १.७ | २.० |
| कॅनडा | ८६ | ७९ | ३.० | १.७ | २.४ |
| इटली | ८४ | ७६ | ३.५ | १.८ | २.७ |
| जपान | ७८ | ७५ | ४.९ | ०.७ | २.८ |
| ग्रेटब्रिटन | ७८ | ६६ | ४.९ | ३.२ | ४.१ |
| न्यूझीलंड | ७२ | ६१ | ६.२ | ३.३ | ४.८ |
| स्पेन | ८२ | ५५ | -३.९ | ७.६ | ५.८ |
| फ्रान्स | ६९ | ५४ | ७.० | ५.० | ६.० |
| ऑस्ट्रिया | ५९ | ५३ | १०.१ | २.२ | ६.२ |
| ऑस्ट्रेलिया | ६१ | ५२ | ९.४ | ३.१ | ६.३ |
| टर्की | ८८ | ४२ | २.४ | १२.७ | ७.७ |

---

### कापडाच्या वाढत चाललेल्या किंमती

इंडियन कॉटन मिल्स फेडरेशनचे अध्यक्ष श्री. ठाकरसी ह्यांनीं कापडाच्या वाढत चाललेल्या किंमतीबद्दल आपले विचार व्यक्त केलें आहेत. ह्यासंबंधीं पत्रकारांशीं बोलतांना ते म्हणाले कीं, जाड्या व मध्यम प्रतीच्या कापडाच्या किंमती वाढलेल्या आहेत ह्याची फेडरेशनला पूर्ण जाणीव आहे. ह्यावर उपाय म्हणून कापडावर त्याच्या किंमती छापण्याचा उपाय मात्र बरोबर नाहीं.त्यामुळें कापड गडप होण्याचा बराच संभव आहे. सध्यां कापडाच्या किंमती नेहमींपेक्षा २० ते ३० टक्क्यांनीं वाढलेल्या आहेत. चालू हंगामांत देशी व परदेशी कापसाच्या किंमती वाढल्या आहेत. त्यामुळें कापडाच्या किंमतीहि वाढल्या आहेत. जाड्याभरड्या व मध्यम-प्रतीच्या कापडाच्या उत्पादनासाठीं ज्या प्रकारचा कापूस वापरला जातो त्याच्या किंमती विशेष वाढल्या आहेत. दर खंडीमागें २०० ते ३०० रु. इतकी वाढ ह्या प्रकारच्या कापसाच्या किंमतींत झालेली आहे. कापसाच्या पिकाचा यंदाच्या हंगामांत अंदाज ४३ लाख गासड्या करण्यांत आला होता; परंतु अलीकडे केलेल्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें कापसाचें उत्पादन ३७ लाख गासड्याच होईल असें दिसतें. देशी कापसाच्या उत्पादनांत अशी घट आल्यामुळें कापडाच्या गिरण्यांना ह्या वर्षीं १० लाख गासड्या परदेशी कापूस वापरावा लागणार आहे. गेल्या तीन वर्षांत परदेशी कापसाच्या वापराचें प्रमाण ५ लाख गासड्यांच्या आसपास होतें. तथापि कापसाच्या वाढत्या किंमतीमुळेंच फक्त कापडाच्या किंमती वाढल्या असें नाहीं. मध्यवर्ती वेतन–मंडळाच्या शिफारसी अंमलांत आणल्यामुळें कामगारांच्या पगारांत व महागाईभत्त्यांत झालेली वाढहि त्याला कारण आहे.

---

## कचेरींत वर्गभेद आवश्यकच आहे !

### बढती मिळालेल्या तरुणांना अनुभवी सल्ला

आमची कंपनी म्हणजे एखादें सुखी कुटुंबच आहे; वरिष्ठ अधिकाऱ्यांना घरगुती नांवानेंच संबोधतात आणि मुख्य अधिकाऱ्याचे खोलींत सर्वांना प्रवेश आहे, असें कित्येक चालक अभिमानानें सांगतात. पण, व्यवस्थित रीतीनें चाललेल्या कचेरींत तसें कांहीं आढळत नाहीं; 'मॉडर्न ऑफिस प्रोसीजर्स' ह्या मासिकानें पाहणी करून असा निष्कर्ष काढला आहे, कीं यशस्वी कंपन्यांतील नोकरांचा वर्गभेद अभेद्य असतो आणि कंपन्यांना त्याबद्दल आनंदच होत असतो.

शिस्तीच्या दृष्टीनें हा वर्गभेद आवश्यकच असतो, असा पहाणीमधील उत्तरांचा रोख होता. कुणीतरी हुकूम देणारा हवा. कुणीतरी ते हुकूम पाळणारा हवा. मैत्रीमुळें ह्या नात्यांत व्यत्यय आला, तर कंपनीचें नुकसान होतें. आपल्या हाताखालच्या नोकरांशीं केव्हांतरी कठोर बोलण्याची पाळी येतेच; पण त्यांच्याशीं फार मिसळणाऱ्या वरिष्ठाला कठोर बनतां येत नाहीं. एका कंपनीनें, नोकरांच्या घरांतून दरमहा कांहीं अल्पोपहारांचे कार्यक्रम करून पाहिले; त्यांत निर्माण होणारी कुरबूर, भांडणतंटे, ह्यांनीं कचेरींतहि प्रवेश केला ! ह्या अनुभवानंतर, चालकांनीं अधिकाऱ्यांना असें खेळीमेळीचें नातें ठेवण्यास बंदी केली.

नुकतीच बढती मिळालेल्यांना कचेरींतील वर्गभेद फार जाचक होतो; कारण त्यामुळें त्यांना व त्यांच्या पत्नींना जुने मित्र तोडावे लागतात. आपल्या पतीच्या हाताखालच्या नोकरांचे पत्नींशीं स्नेहाचें नातें ठेवणाऱ्या स्त्रिया धोकादायक ठरतात; कारण पतीच्या कामांत त्याचा व्यत्यय येऊन त्याचें मत नसत्या गोष्टींमुळें बनून जाण्याचा संभव असतो. बढती मिळालेल्या तरुणांसाठीं 'मॉडर्न ऑफिस प्रोसीजर्स'नें खालील नियम सुचविले आहेत :—

(१) जुने मित्र आणि हाताखालचे लोक ह्यांचेशीं संबंध तोडा.

(२) चहा–कॉफीच्या कार्यक्रमांत सामील न होण्यासाठीं सतत कारणें शोधा; हळूहळू त्यांतून कायमचें अंग काढून घ्या.

(३) सुरवातीला खालच्या नोकरांना घरीं बोलावलें तर एकदम तोडूं नका; पण त्यांना तुम्हीं बोलवाल तेव्हां एकएकट्याला न बोलावता, एकदम बऱ्याच जणांना बोलवा; नंतर निमंत्रणें स्वीकारण्याचें बंद करा.

(४) पत्नीला कचेरींतील अडचणींची माहिती नसते; तेव्हां तिलाहि जुने संबंध तोडायला अधिक वेळ द्या.

---

**संयुक्त-राष्ट्रसंघ सेनेला मदत**—कांगोमध्यें धाडण्यांत आलेल्या संयुक्त–राष्ट्रसंघाच्या सेनेला वाहतुकीच्या साधनांची गरज आहे. ह्या कामासाठीं उपयोगी पडाव्या म्हणून रशिआ १०० लॉऱ्या पुरविणार आहे. संयुक्त-राष्ट्र–संघटनेचे चिटणीस मि. डॅग हॅमरशोल्ड ह्यांच्या विनंतीवरून ही मदत पाठविण्यांत येत आहे.

**चोरलेल्या चेक्सच्या साह्यानें प्रवास**—ऑस्ट्रेलिआंतील एका विद्यापीठांत व्याख्यात्याचें काम करणाऱ्या माणसानें चोरलेल्या चेक्सच्या साह्यानें निम्म्या जगाचा प्रवास केला. अखेर त्याला पॅरिसमध्यें अटक झाली. ह्या चेक्सचा उपयोग करून त्यानें २,२५,००० डॉलर्स बँकांतून काढले.

---

**माधवाश्रम लि.** भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

# अर्थ

बुधवार, ता. ३ ऑगस्ट, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आयुर्विम्याच्या व्यवसायाची प्रगति

आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या बोर्डापुढें भाषण करतांना कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् ह्यांनीं आयुर्विम्याच्या व्यवसायाच्या प्रगतीची आंकडेवार माहिती दिली आहे. त्यावरून कॉर्पोरेशनच्या प्रगतीचें पुढील चित्र डोळ्यासमोर उभे राहतें. १९५९ सालीं कॉर्पोरेशननें ४२९ कोटी रुपये किंमतीचा नवा धंदा मिळविला. १९५८ सालीं ३४५ कोटींचा नवा धंदा मिळविण्यांत आला होता. टक्केवारीच्या भाषेंत धंद्यांत झालेली वाढ २५ टक्के होते. १९५७ च्या मानानें १९५८ सालीं नव्या धंद्यांत २२ टक्के वाढ झालेली होती. विमापत्रकांच्या संख्येच्या दृष्टीनें १९५७ सालापेक्षा १९५९ सालीं ४१ टक्के अधिक विमापत्रकें देण्यांत आलीं. विम्याच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी हप्ते न भरल्यामुळें रद्द होणाऱ्या विमापत्रकांची संख्या बरीच असे. पण कॉर्पोरेशनचा ह्या बाबतींतील अनुभव उत्तेजनक आहे. १९५४ पासून १९५८ पर्यंतचें रद्द विमापत्रकांचें प्रमाण पाहाता अशा रीतीनें रद्द होणाऱ्या विमापत्रकांची संख्या उत्तरोत्तर घटत चाललेली असल्याचें दिसून येतें. १९५९ सालांतील रद्द झालेल्या विमापत्रकांची संख्या अद्याप कळण्यांत आलेली नाहीं. १९५९ सालीं परदेशांतून मिळालेल्या आयुर्विम्याच्या धंद्याबाबतहि प्रगति झालेली आहे. १९५७ सालीं परदेशांतून ५·४० कोटींचा नवा धंदा मिळाला होता. १९५८ सालीं परदेशांतून ५·६२ कोटी रुपयांचा धंदा मिळाला व १९५९ सालीं तो ९·४७ कोटी रुपये किंमतीचा झाला. कॉर्पोरेशननें परदेशांत धंदा मिळविण्यासाठी जे प्रयत्न केले त्याचा हा परिणाम होता. १९५८ सालीं कॉर्पोरेशन अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् पूर्व आफ्रिकेंत जाऊन आले होते. १९५९ सालीं त्यांनीं सिंगापूरचा दौरा केला होता.

कॉर्पोरेशननें नव्यानें सुरू केलेल्या जनता–विमापत्रकाला सर्वच ठिकाणीं सारखें यश येत नसलें तरी त्यांची संख्याहि हळूहळू वाढत चालली आहे. १९५७ सालीं १·१७ कोटी रुपये दर्शनी किंमतीचीं २१,२०८ जनता विमापत्रकें लोकांना देण्यांत आलीं होतीं. १९५८ सालीं १·६१ कोटी रुपये किंमतीचीं २४,३२५ जनता–विमापत्रकें देण्यांत आलीं व १९५९ सालीं २·०१ कोटी रुपये किंमतीचीं २८,७०५ विमापत्रकें देण्यांत आलीं. देशांतील ज्या सामाजिक थरांत विम्याचा अद्याप प्रसार झालेला नाहीं त्या थरांत तो करण्याचे प्रयत्न कॉर्पोरेशननें केले. परंतु ह्या प्रयत्नांच्या यशापयशाबद्दल पुरेशी माहिती हातीं आलेली नाहीं. एकंदरीनें आयुर्विम्याचें राष्ट्रीयीकरण झाल्यापासून नव्या धंद्याची जोरानें वाढ होत चाललेली आहे. १९५६ अखेर चालू असलेल्या विमापत्रकांची दर्शनी किंमत १,२२० कोटी रुपये होती. इतका धंदा करण्यासाठी हिंदुस्थानांतील सर्व कंपन्याना कित्येक दशकें काम करावें लागलें. १९५९ सालीं कॉर्पोरेशनचा १,९६४ कोटी रुपये दर्शनी किंमतीचा धंदा म्हणजेच विमापत्रकें चालू होतीं. म्हणजे १९५५ सालापेक्षा १९५९ सालीं ७४४ कोटींचा अधिक धंदा चालू होता. ही वाढ सुमारें ६० टक्के पडते. १९५९ अखेर चालू विमापत्रकांची संख्या जवळ जवळ ७० लाखाच्या घरांत होती. १९५८ सालाशीं तुलना करतां ही वाढ ४५ टक्के पडते.

---

## साखरेच्या उत्पादनानें उच्चांक गांठला

गेल्या वर्षी भारतांत साखरेच्या उत्पादनानें उच्चांक गांठला; एकूण उत्पादन २४ लक्ष टन झालें. पूर्वीच्या दोन मोसमांतील उत्पादनाच्या सरासरीपेक्षा अधिक होणाऱ्या उत्पादनावर निम्मी एक्साइज ड्यूटी माफ केल्यामुळें, उत्पादनवाढीला चालना व प्रोत्साहन मिळालें. ऊंसगाळणीस प्रारंभ लवकर झाला, उसाच्या किंमतींत वाढ झाली आणि उत्पादनक्षमता वाढली, ह्यामुळेंहि साखरेच्या अधिक उत्पादनास चालना मिळाली. मुंबई राज्यांतील कारखान्यांनीं १९५९–६० मध्यें ३·९९ लक्ष टन साखर तयार केली; १९५८–५९ मधील उत्पादन ३·२१ लक्ष टन होतें. १९५९-६० मधील २४ लक्ष टनांचें उत्पादन व प्रारंभींचा १·७३ लक्ष टनांचा सांठा मिळून एकूण २५·७३ लक्ष टन साखर उपलब्ध झाली. २०·७१ लक्ष टन साखरेचा खप होऊन १ नोव्हेंबर, १९६० रोजीं सुमारें ५ लक्ष टन साखर शिल्लक राहील असा अंदाज आहे.

महाराष्ट्र राज्यांतील २६ साखर कारखान्यांपैकीं १३ कारखाने सहकारी आहेत. येत्या मोसमांत आणखी एक सहकारी कारखाना ऊंस गाळूं लागेल. आणखी ५ सहकारी कारखान्यांच्या उभारणीस मध्यवर्ती सरकारनें मंजुरी दिली आहे. ( कोल्हापूर २, पुणें २, अहमदनगर १ ) आणखी सहा कारखान्यांचे अर्ज मंजुरीची वाट पहात आहेत. ह्या सहांपैकीं दोन पुणें जिल्ह्यांत आणि अहमदनगर, नाशिक, नांदेड व सातारा ह्या जिल्ह्यांत प्रत्येकी एक, अशी जिल्हावार वांटणी आहे. १ नोव्हेंबर, १९६१ पासून साखरेच्या धंद्यांत मेट्रिक पद्धतीचा वापर सक्तीचा होणार आहे. कांहीं कारखाने येत्या मोसमापासूनच मेट्रिक पद्धतींची वजनेंमापें सुरू करणार आहेत. एक्साइज खातें ऑगस्ट, १९६० पासून मेट्रिक पद्धत स्वीकारणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्याप्रमाणें, वार्षिक ३० लक्ष टनांच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलेलें असून १९६५–६६ पर्यंत तें साध्य व्हावयाचें आहे. साखरेच्या वाढत्या मागणीकडे लक्ष देऊन सरकारनें हें उद्दिष्ट आणखी वाढवावें. इतर मूलभूत उद्योगधंदे उभारण्यासाठी शक्य तेवढें आर्थिक बळ उपयोगांत आणण्याचें सरकारचें धोरण योग्यच आहे; पण साखरेचें उत्पादन आणखी वाढणें, साखरेचे ग्राहक व अर्थखातें ह्यांच्या हितांचेंच होईल, ह्याकडे दुर्लक्ष होऊं नये. डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एफ. एडवर्डस् ह्यांनीं असोसिएशनच्या वार्षिक सभेंत वरीलप्रमाणें साखरेच्या धंद्याचा आढावा घेतला. असोसिएशननें १९६०–६१ साठी श्री. एफ. एडवर्डस् ( बेलापूर कं. लि. ) आणि श्री. एम. एल. आपटे ( फलटण शुगर वर्क्स लि. ) ह्यांची अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून फेरनिवड केली आहे.

---

## जमीनसुधारणा कायद्यांचीं उद्दिष्टें

### उत्पादन वाढविणें आणि विषमता दूर करणें

जमीनसुधारणाविषयक कायदे व कार्यक्रम यांच्या मुळाशी दोन परस्परसंलग्न अशीं उद्दिष्टें असून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांवर विशेष भर दिला जात आहे. यापैकी, शेतकी उत्पादनामधील अडथळे दूर करणें आणि त्याद्वारें अन्नधान्याचें अधिक उत्पादन होऊं लागेल व शेतकींतील कार्यक्षमता वाढीस लागेल अशी परिस्थिति निर्माण करणें हें पहिलें उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमाचें दुसरें उद्दिष्ट म्हणजे शेतकऱ्याची पिळवणूक होण्यास व सामाजिक-दृष्ट्या त्याच्यावर अन्याय होण्यास जबाबदार असणाऱ्या सर्व बाबी नाहींशा करणें आणि त्याला सर्व प्रकारची सुरक्षितता मिळवून देणें हें होय.

उत्पादन वाढविणें व विषमता कमी करणें असें यांचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. शेतकऱ्याची पिळवणूक करणाऱ्या ज्या अनेक पद्धति स्वातंत्र्यपूर्व काळांत अस्तित्वांत होत्या त्या टप्याटप्यानें नाहींशा करून वरील उद्दिष्टें साध्य करणें आवश्यक आहे, हें ओळखण्यांत आलें आहे.

या दिशेनें जाण्यासाठी मध्यस्थांचें उच्चाटन, कुळकायद्यांत सुधारणा, कुळांना जमीन वहिवाटीची हमी मिळवून देणें, जमीन-मालकीची कमाल मर्यादा आणि शेतीसाठी सहकारी संघटनांची स्थापना, इत्यादि सुधारणा हातीं घ्याव्या लागतील.

जमीन सुधारणा विषयक कार्यक्रमांत शेतमजुरीच्या परिस्थितींत सुधारणा करणें ही बाब विशेष महत्त्वाची समजली जाते.

### जादा लोकसंख्या : अपुरी जमीन

भारतांतील शेतजमिनीवर बरीच मोठी लोकसंख्या अवलंबून असून शेतीवर त्याचा फार ताण पडत आहे ही गोष्ट सर्वश्रुत आहे. लोकसंख्येच्या मानानें देशांत जमीन अपुरी आहे. भारतांत दरडोई १.६ एकर किंवा कुटुंबामागें अंदाजें ८ एकर जमीन असें प्रमाण पडतें. गेल्या शिरगणतीवरून हा अंदाज तयार करण्यांत आला आहे. देशांतील वाढत्या लोकसंख्येमुळें हें प्रमाणहि पुढेंपुढें कमी होत जाण्याचा संभव आहे.

शेतकरी आपल्या जमिनींत जीव ओतून काम करील व आपल्या कामांत रस घेईल अशा रीतीनें देशांतील जमिनीची व्यवस्था लावणें निकडीचें आहे, ही गोष्ट यावरून स्पष्ट दिसून येते. भारतीय शेतकीच्या विकासांत शेतकऱ्याला सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देणें याबरोबरच वरील गोष्टीचेंहि महत्त्व फार आहे.

बहुतेक राज्यांतून मध्यस्थांचें (जमीनदारी, जहागिरी व इनामदारी) उच्चाटन करण्याच्या दृष्टीनें कायदे करण्यांत आले आहेत. यापूर्वी देशाच्या अर्ध्या भागांत जमीनदारी, इनामदारी अशा मध्यस्थ कुळवहिवाट पद्धति अस्तित्वांत होत्या, तर देशाच्या उरलेल्या भागांत रयतवारी पद्धति अस्तित्वांत होती. पहिल्या पद्धतींतील कुळांचा राज्यसरकारशीं प्रत्यक्ष संबंध आणण्यांत आला असून त्यामुळें त्यांना आतां आपल्या जमिनीबद्दल आपुलकी वाटूं लागली आहे. यापूर्वी त्यांची जी पिळवणूक होत असे, त्यांतून त्यांना आतां मुक्तता मिळवून देण्यांत आली आहे. कांहीं राज्यांतून अशा कुळांना मालकीहक्क मिळवून देण्याची तरतूद आहे.

मध्यस्थांची नुकसानभरपाई करण्यांत आली आहे. मध्यस्थांचें उच्चाटन करण्याचें कार्य केवढें प्रचंड आहे याची कल्पना, एकूण नुकसानभरपाई दाखल ४३५ कोटी रुपये द्यावे लागणार आहेत, यावरून येईल. १९५८-५९ अखेरपर्यंत भरपाईदाखल १२९ कोटी रुपये देण्यांत आले.

### खंड कमी झाला

खंडाचे नियम करणारे कायदे कांहीं राज्यांनीं पास केले असून इतर कांहीं राज्यांतून तशा स्वरूपाच्या विधेयकावर विचार चालू आहे.

सर्वसाधारणपणें सध्या कोणत्याहि कुळाला एकूण उत्पादनाच्या ¼ पेक्षा अधिक खंड भरावा लागत नाहीं. कांहीं राज्यांतून हें प्रमाण ⅙ इतकें कमी आहे; मात्र कांहीं राज्यांत खंडाचें प्रमाण अद्याप ⅓ पर्यंत यावयाचें आहे. खंडाचें नियमन करणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी समाधानकारक आहे. कायद्यांत कांहीं उणिवा असल्यास त्याकडे राज्य सरकारांचें लक्ष आहे.

कुळवहिवाटींत सुरक्षितता मिळवून देशाच्या दृष्टीनें व्यापक उपाययोजना करण्यांत आल्या असून अनेक राज्यांनीं तसे कायदे केले आहेत. उर्वरित राज्यांनीं तशा अर्थाचीं विधेयकें विचारार्थ राज्य कायदेमंडळापुढें ठेवलीं असून त्यांचें कायद्यांत रूपांतर होण्यापूर्वीच्या काळांत कुळें जमिनीवरून हाकललीं जाऊं नयेत म्हणून उपाययोजना केल्या आहेत. कुळांनीं तथाकथित "स्वखुषीनें" जमीन मालकाकडे देऊं नये म्हणून त्यांच्या संरक्षणार्थ कांहीं राज्यांनीं उपाययोजना केल्या आहेत.

द्वितीय योजनेंत असें सुचविण्यांत आलें कीं परत मिळूं न शकणाऱ्या (नॉन रिझ्युमेबल) जमिनीवरील कुळांनीं भरपाई केल्यास त्यांना संपूर्ण मालकीहक्क मिळावेत. या दृष्टीनें विविध राज्यांनीं अनेक उपाययोजना केल्या आहेत. पूर्वीच्या मुंबई राज्यांत १ एप्रिल १९५७ या "कसणाऱ्यांच्या दिनीं" १३ लक्ष कुळांना सुमारें २४ लक्ष एकर जमिनीचे मालकीहक्क मिळवून देण्यांत आले. मात्र तृतीय योजनेच्या मसुद्यांत असें म्हटलें आहे कीं कुळांना मालकीहक्क मिळवून देण्याच्या दृष्टीनें झालेली प्रगति अपुरी आहे. अशा प्रकारच्या जमिनीवरील कुळांना ठराविक मुदतींत मालकीहक्क मिळवून देण्यावर योजनेनें भर दिला आहे.

### जमीनमालकीवर मर्यादा : उत्पन्नावर नाहीं

जमीन ताब्यांत घेण्यावर यामुळें कमाल मर्यादा घालणारे कायदे बहुतेक सर्व राज्यांनीं एकतर पास केले आहेत किंवा विचारार्थ आणले आहेत. तसेंच सध्याच्या जमीनमालकीवर कमाल मर्यादा घालणारे कायदे कांहीं राज्यांनीं पास केले आहेत तर कांहीं राज्यांनीं विचारार्थ ते कायदेमंडळांपुढें ठेवले आहेत.

जमीनमालकीवर मर्यादा म्हणजे उत्पन्नावरहि मर्यादा असा अर्थ होत नाहीं. जमीनमालकीची कमाल मर्यादा ठरवून दिल्यानंतर त्यांतून किती उत्पन्न काढावें तें मालकावर अवलंबून राहील. त्यानें केलेल्या सुधारणांमुळें जमिनींतून जास्त उत्पादन होऊन त्याचें उत्पन्न वाढल्यास, वाढलेल्या उत्पन्नाच्या किंमतीइतकी जमीन त्याला सोडून द्यावी लागणार नाहीं. शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यास जमिनींतून जादा उत्पादन होऊं शकेल व उत्पन्नहि वाढूं शकेल. देशांतील दर एकरीं उत्पादन फारच कमी असल्यानें एकरीं उत्पादनवाढीला बराच वाव आहे.

जमीनसुधारणा कार्यक्रमांत शेतमजुरांच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्यांत येत आहे. या दृष्टीनें हातीं घेण्यांत आलेली एक महत्त्वाची उपाययोजना म्हणजे देशांतील जादा व लागवडीयोग्य करून घेतलेल्या जमिनीचें शेतमजुरांत वाटप करण्यांत येत आहे.

जमीनसुधारणा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमुळें देशांतील शेतकऱ्यांत मालक शेतकऱ्यांचें प्रमाण मोठें होईल. पतपुरवठा, बाजारपेठा, प्रक्रिया व वाटप आणि यासाठी स्वयंस्फूर्त सहकारी संघटना उभारण्यास त्यांना उत्तेजन व मदत दिली गेली पाहिजे. तसेंच त्यांच्या संमतिनुसार, सतत उत्पादन वाढविण्यासाठींहि सहकारी संघटना उभारण्यास उत्तेजन दिलें पाहिजे.

# भारतांत अणुशक्तीपेक्षा सूर्यशक्ति उपयुक्त ठरेल

## संशोधनाच्या दिशेचें मार्गदर्शन

(प्रा. डी. डी. कोसंबी)

अणुशक्तीचा शोध हा शक्तिसाधनेच्या इतिहासांतील क्रांतिकारक शोध आहे, कारण यांत सूर्यशक्तीच्याच प्रक्रिया मात्र सूर्याच्या मदतीशिवाय आपण पृथ्वीवर साधूं शकतों. मात्र या अणुशक्तीच्या निर्मितीमधील व वापरांमधील धोके मानवजातीच्या दृष्टीनें उपेक्षणीय मानतां येणार नाहींत. अणुशक्तीचा भूतलावरील साक्षात्कारच मुळीं हिरोशिमा व नागासाकींतील विध्वंसित जीवनाच्या रूपानें पाहावयास मिळाला व तेव्हांपासून राजकीय थंड्या युद्धांतील एक प्रभावी साधन म्हणूनच अणुशक्तीचा वापर आज प्राधान्येंकरून होत आहे. अणुशक्तीचा वापर करून वाळवंटांचीं नंदनवनें बनवितां येतील आणि जंगलांमध्यें उद्योगनगरी उठवितां येईल, पण यासाठी अणुशक्तीची निर्मिति हा तांत्रिक किंवा राजकीय विषय न मानतां सामाजिक विषय मानला गेला पाहिजे.

### अणुशक्तींतील भयानक धोके

याशिवाय अणुशक्तिनिर्मितीची भांडवली किंमत किती? हा प्रश्न शिल्लक उरतोच आणि भारतासारख्या देशाला दुसऱ्या देशांनीं साहाय्य केलें नाहीं तर न परवडण्याएवढी ही भांडवली किंमत आहे, असेंच मान्य करावें लागेल. याशिवाय अणुशक्तीची निर्मिति करतांना वाया जाणाऱ्या किरणोत्सर्गी पदार्थांची विल्हेवाट कशी लावावयाची हाहि चिंतनीय प्रश्न सर्व राष्ट्रांसमोर आहेच. अणुशक्तीच्या शास्त्रीय वापरासाठी म्हणून केलेल्या छोट्या छोट्या प्रायोगिक स्फोटांचे जे परिणाम जगभर आढळून आले आहेत ते भयानक आहेत. भावी पिढ्यांतून आनुवंशिक दोष, विशेषत: वेडेपणा व असाध्य रोग यांची निर्मिति होण्याची जी शक्यता प्रयोगान्तीं सिद्ध झाली आहे त्यामुळें प्रगत राष्ट्रांपैकी कित्येकांनीं अणुशक्तिनिर्मितीच्या कार्यक्रमांत काटछाट करण्यास प्रारंभ केला आहे. 'आमच्याकडेहि अणुविद्युत् केन्द्रें आहेत,' अशा प्रतिष्ठेची किंमत भयंकर धोका विकत घेऊन फेडावयाची काय, हा खरा प्रश्न आहे.

### भारताला अणुशक्ति परवडणार नाहीं

आतां भारताच्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करूं या. आपल्या राष्ट्रीय प्रगतीला अणुशक्तीचा वापर अपरिहार्य आहे काय? हायकमांडनें या प्रश्नाचें होकारार्थी उत्तर दिलें असून खर्च झालेल्या कित्येक कोटि रुपयांत आणखी १०० कोटींची भर घालून अणुशक्तिनिर्मितीचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. १० कोटि रु. खर्च करून बांधलेल्या अणुभट्टीवर २,००० उच्च पदवीधर खपत आहेत व ही अणुभट्टी सुरू झाली आहे हें खरें, पण अजून प्रत्यक्ष उपयोगासाठी अणुशक्तीचा वापर होईल अशी स्थिति मात्र आलेली नाहीं आणि अशी स्थिति प्राप्त झाली तरी अणुशक्ति स्वस्त पडेल ही कल्पना भ्रम ठरल्याशिवाय राहणार नाहीं. आपण प्रचंड किंमत देण्यास तयार असलों तर अमेरिका, रशिआ, इंग्लंड, कॅनडा, फ्रान्स, कोणताहि प्रगत देश आपल्याला अणुभट्टी बांधून द्यावयास तयार होईल. 'आपल्या देशाला ही जबर किंमत परवडेल का?' हा प्रश्न महत्त्वाचा आहे. या प्रश्नाचें उत्तर बुद्धिमान् माणसांनीं स्वत:च शोधावें, तें उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां एका अनंत कालपर्यंत टिकणाऱ्या व विनामूल्य वापरतां येण्याजोग्या प्रचंड शक्तिस्तोत्राकडे म्हणजे 'सूर्यशक्ति'कडे मी आपलें लक्ष वेधूं इच्छितों. 'या सूर्यशक्तीचा प्रत्यक्ष वापर आपण करणार कीं नाहीं' असा माझा प्रश्न आहे.

### सूर्यशक्तीची अपूर्वाई

आणि असा उपयोग आपण अवश्य करूं शकूं असें माझें उत्तर आहे. इंग्लंड, अमेरिका, रशिआ या देशांना पुरेसा सूर्यप्रकाश नाहीं म्हणून त्यांनीं या क्षेत्रांत आघाडी गांठली नाहीं. आपण प्रत्येक गोष्टींत त्यांचेंच अनुकरण करून अणुशक्तिनिर्मितीच्या प्रचंड खर्चाचा बोजा शिरावर घेणार काय?

सरासरी एका दिवशीं प्रत्येक शंभर चौरस मीटर क्षेत्रावर म्हणजे १,१०० चौरस फुटांवर ६०० किलोवॅट तास उष्णता सूर्यापासून मिळते. १६० पौंड उत्तम कोळसा, १६ गॅलन पेट्रोल यांच्यापासून मिळणाऱ्या उष्णतेएवढी ही उष्णता आहे. वरील परिमाणांतील या उष्णतेचा १०० टक्के वापर आपण करूं शकलों तर दरदिवशीं २४० गॅलन पाण्याची वाफ आपण निर्माण करूं शकूं.

'सोलर-बॅटरीज्'च्या साहाय्यानें ११ ते १५ टक्के उष्णतेचा वापर आजहि केला जातो. अमेरिकेंत दूरध्वनीच्या दळणवळणासाठी या बॅटऱ्यांचा उपयोग होत आहे. माझ्या बंगल्याच्या छपरावरील सूर्याच्या उष्णतेचा मीं उपयोग केला तर दर तासाला सूर्यप्रकाशापासून दर दिवशीं ६० किलोवॅट शक्ति मी संपादूं शकेन. दक्षिण रशिआंत १५,००० नागरिकांच्या एका वसाहतीच्या सर्व गरजा भागविण्याएवढी सूर्यशक्ति आजहि संपादन केली जात आहे. एवढेंच कशाला १८७६ मध्यें या अश्वशक्तीचा एक वाफेवर चालणारा पंप मुंबई शहरांत सूर्यशक्तीवर चालविला जात होता!

### भारतांत संशोधन व्हावें

अणुशक्ति वापरा किंवा वापरूं नका; सूर्यशक्तीच्या उपयोगाचें संशोधन भारताच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त ठरेल असा माझा विश्वास आहे. पण संशोधन म्हणजे केवळ प्रबंधलेखन, लाडक्या मंडळींचें शिष्टमंडळ परदेशांत पाठविणें किंवा करदात्यांचे कोट्यवधि रु. संशोधनानुदान म्हणून वाटण्याचे अधिकार ज्यांच्या हातीं आहेत अशा राजकीय पुढाऱ्यांना आपल्या खिशांत ठेवणें एवढाच मर्यादित अर्थ मी मानीत नाहीं. आपलें संशोधन प्रत्यक्षत: उपयुक्त ठरलें पाहिजे, असा माझा आग्रह आहे. सूर्यशक्तीच्या बाबतींतील संशोधनाची मेख शक्ति कशी सांठवितां येईल यांत आहे. या प्रश्नाचें उत्तर असाध्य आहे असें मी मानीत नाहीं. शक्ति कोंडून ठेवणाऱ्या कितीतरी कार्यक्षम बॅटऱ्या निघालेल्या आहेत व कितीतरी यांत्रिक प्रक्रियाहि उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ: खेड्यामध्यें ५० फूट उंचीवरील एखाद्या टाकींत दिवसा सूर्यशक्तीचा उपयोग करून पाणी चढविलें व सांठवून ठेवलें तर त्याचा पाटांसाठी किंवा छोट्या प्रमाणावर वीज-निर्मितीसाठी उपयोग होऊं शकेल. मात्र कार्यक्षमतेच्या कसोटीपेक्षा उपयुक्ततेची प्रधान कसोटी येथें लावली पाहिजे.

### विकेंद्रीकरण साधेल

सूर्यशक्तीच्या वापराचा सर्वांत महत्त्वाचा लाभ म्हणजे विकेंद्रीकरण. सर्वंकष नॅशनल ग्रीड स्थापून सर्व भारताचें विद्युतीकरण, आपलीं विद्युतनिर्मितीचीं तोकडीं साधनें ध्यानांत घेतां, अवघड आहे. पण सूर्यशक्तीच्या उपयोगानें स्थानिकरीत्या विजेचा पुरवठा करतां येईल, कारण भारतांत स्थानिक उपयोगासाठी सूर्यशक्तीसारखी दुसरी कोणतीहि उत्तम शक्ति उपलब्ध नाहीं. भारताला कोणत्याहि स्वरूपाचा कां असेना पण समाजवाद नोकरशाहीचे दुष्परिणाम टाळून व प्रचंड प्रारंभिक भांडवल गुंतवणुकीशिवाय आणावयाचा असेल तर सूर्यशक्तीशिवाय अन्य उत्तम साधन नाहीं. वनसंपत्तीच्या वाढीचा साधा प्रश्न घ्या. लोकांन

दुसरें स्वस्त जळण पुरविल्याशिवाय झाडें तुटणें थांबणार नाहीं व हा प्रश्न सुटणार नाहीं. 'सूर्य-चूल' हेंच त्याला उत्तर आहे.

### सूर्य-चूल साधली पाहिजे

काहीं दिवसांपूर्वी 'सूर्य-चूल' तयार झाल्याची जाहिरात झाली होती, पण या चुलीवर उष्णताग्रहणासाठी जें भांडें बसवावयाचें तें चकचकीत बसविलें होतें. त्यामुळें सूर्यकिरण परावर्तित होऊन चुलीला त्याचा लाभच झाला नाहीं. लहान मुलाला सुद्धां समजूं शकेल अशी गोष्ट मोठ्या शास्त्रज्ञांना उमगली नाहीं. हा उपयुक्त कामापेक्षा कागदी व पुस्तकी संशोधनाकडे लक्ष देण्याचा परिणाम आहे, प्रसिद्धि-उन्मुख संशोधनाचा हा परिपाक आहे. सध्या संशोधनाच्या मार्गातील या प्रवृत्तीचा व अडचणींचा अडसर दूर झाला तर अणुशक्तीचाहि आधार असलेला सूर्य दररोज निदान आठ महिने तरी, आपल्या दिमतींत राहूं शकेल. शेतकऱ्यांना हंगामाव्यतिरिक्त उरलेल्या दिवसांत उपजीविकेचें साधन पुरविण्याची संधीहि आपल्याला मिळूं शकेल.

(पुणें रोटरी क्लबांतील भाषण)

---

### मध्यवर्ती महसुली उत्पन्नाचे तुलनात्मक आंकडे

महत्त्वाच्या वस्तूंवर आकारण्यांत येणाऱ्या मध्यवर्ती करांपासून १९६०-६१ च्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत १०३·०५ कोटी रु. उत्पन्न आलें. यांपैकी ५३·८८ कोटी रु. मे १९६० मध्यें मिळालें. १९५९-६० च्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत अशा प्रकारें ८७·२८ कोटी रु. आणि मे १९५९ मध्यें ४४·१६ कोटी रु. मिळाले होते.

उत्पन्नाच्या कोणकोणत्या बाबींपासून किती उत्पन्न मिळालें तें पुढील तक्त्यांत दिलें आहे:—

(आंकडे लक्ष रुपयांचें)

| | मे | | एप्रिल-मे | |
|---|---|---|---|---|
| | १९६० | १९५९ | १९६०-६१ | १९५९-६० |
| १. जकात | १,३०७ | १,११९ | २,४५१ | २,३२९ |
| २. मध्यवर्ती अबकारी कर (मीठ आणि कोळशावरील कर वगळून) | ३,३२७ | २,८१६ | ६,४३० | ५,४७३ |
| ३. कॉर्पोरेशन टॅक्स | १४६ | ६२ | २९८ | १३३ |
| ४. प्राप्ति कर | ५४७ | ३५७ | ९४३ | ६३६ |
| ५. वारसा कर | १० | १२ | २५ | २९ |
| ६. संपत्ति कर | १९ | १८ | ६४ | ५८ |
| ७. खर्च कर | * | ३ | ३ | ४ |
| ८. देणगी कर | २ | २ | ८ | ७ |
| ९. अफू | ३० | २७ | ८३ | ५९ |
| एकूण | ५,३८८ | ४,४१६ | १०,३०५ | ८,७२८ |

### खादीची सरकारी खरेदी

मध्यवर्ती सरकारच्या विविध खात्यांकडून १९५२-५३ मध्यें २७,३७९ रु. किंमतीची खादी खरेदी करण्यांत आली होती. तींत १९५९-६० मध्यें वाढ होऊन एकूण १·०७ कोटी रु. किंमतीची खादी खरेदी करण्यांत आली. चालू आर्थिक वर्षांत १५ जुलै १९६० पर्यंत निरनिराळ्या खात्यांनीं ८३,९९,१३९ रु. किंमतीची खादी खरीदण्यासाठी मागण्या नोंदविल्या आहेत.

* एक लक्षाहून कमी.


## भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् ... | रु. ९१,००० |

मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे (अध्यक्ष) न. भू. ना. पां. थोपटे (उपाध्यक्ष)

रावसाहेब य. द. खोले

श्री. गो. बा. देवी श्री. बा. ग. धंदुके

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस: पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## विकास व कल्याणविषयक कार्यक्रम कार्यकर्त्यांना सेवेची संधि

द्वितीय योजनेच्या सुरुवातीपासून आतापर्यंत सुमारें ५० लक्षांपेक्षा अधिक लोकांनीं समाजसेवा कार्यक्रमांत व स्वयंस्फूर्त श्रमदान-शिबिरांत भाग घेतला आहे. विकासविषयक व कल्याणविषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याच्या कार्यांत मदत करण्यासाठी हीं शिबिरें भरविण्यांत आलीं होतीं. लोकांनीं भाग घेतलेल्या अशा शिबिरांची संख्या द्वितीय योजनेच्या पहिल्या चार वर्षांत ५,००० वर गेली आहे. भारत सेवक समाज, भारत स्काउट्स व गाईड्स, नॅशनल कॅडेट कोअर आणि ऑक्झिलिअरी कॅडेट कोअर व इतर स्थानिक संघटना यांनीं अशा प्रकारचीं शिबिरें भरविलीं. विकास-विषयक कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना लोकांचें सहकार्य मिळविणें, या गोष्टीस महत्त्व असल्याचें पहिल्या योजनेच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यापासूनच स्पष्ट झालें. स्थानिक कल्याणकारी कार्यक्रमांशीं संबंधित असलेल्या कल्याणकारी संघटनांची या दृष्टीनें विशेष मदत होते.

### समाजविकास

समाजविकास कार्यक्रमाद्वारें खेडेगांवांना वाढत्या सोयी मिळवून देण्याचे, तेथील शेतकी उत्पादनांत वाढ करण्याचे आणि ग्रामीण जनतेच्या उत्पादक साधनसामुग्रींत भर पडेल असे प्रयत्न प्रायः स्थानिक जनतेचें सहकार्य घेऊन केले जातात. स्थानिक जनतेची मदत मिळवून त्या जोरावर विकास कार्यक्रम पार पाडणें हें समाजविकास योजनेचें प्रमुख उद्दिष्ट आहे. कित्येक राज्यांतून अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचें काम ग्राम-पंचायतिकडे सोंपविण्यांत आलें आहे.

या बाबतींत बिहार राज्यामधील कोसी नदीच्या पुरापासून लोकांना संरक्षण मिळवून देण्यासाठी भारत सेवक समाजानें केलेल्या कामाचा उल्लेख करतां येईल. या नदीच्या पुरामुळें उत्तर बिहारमध्यें दरसाल लोकांचें नुकसान होई, तेव्हां या नदीला बंधारे घालण्यासाठी भारत सेवक समाजानें पुढाकार घेऊन आणि अक्षरशः हजारो लोकांची मदत मिळवून हें काम पुरें केलें. कोसी येथील स्वयंस्फूर्त कामामुळें, असें दिसून आलें कीं, स्वयंस्फूर्त संघटनांनीं अशा कामांत भाग घेतल्यास पैशाची बचत होते आणि काम करणाऱ्यांनाहि एक प्रकारचें साधन मिळतें. याशिवाय स्थानिक जनतेला अनेक सोयी उपलब्ध होतात त्या वेगळ्याच.

कित्येक स्वयंस्फूर्त संघटनांनीं ग्रामीण विभागांतील कल्याण-विषयक कार्यास वाहून घेतलें आहे. केंद्रीय व राज्य समाज-कल्याण संघटनांनीं सुरू केलेल्या कल्याण-विस्तार प्रकल्पांमुळें कित्येक महिला कार्यकर्त्यांना या भागांतून समाजसेवेचीं कामें करण्याची संधि प्राप्त होऊं लागली आहे. सर्व सेवा संघ, हरिजन सेवक संघ, भारतीय आदिमजाती सेवक संघ आणि कस्तुरबा गांधी स्मारक निधि या अग्रगण्य संस्थांनीं ग्रामीण भागांतूनच कामें हातीं घेतलीं आहेत. समाज-कल्याण व विकासविषयक कार्यक्रमांत स्थानिक जनतेनें मोठ्या प्रमाणांत भाग घ्यावा अशीं कांहीं निवडक लोककार्यक्षेत्रें आहेत.

### शहरी विभागांतील कल्याणकार्य

शहर विभागांतील कल्याणकारी संघटनांनीं देखील स्वच्छता व आरोग्यविषयक सोयींत सुधारणा करणें, साक्षरता प्रसार, गरजू स्त्रियांना कामें मिळवून देणें आणि दुर्लक्षित मुलांची निगा घेणाऱ्या संस्था उभारणें, इत्यादि बाबतींत बहुमोल कार्य केलें आहे. मोठ-मोठ्या शहरांतील दुर्लक्षित विभागांत लोकांच्या सहकार्यानें कामें हातीं घेण्यास बराच वाव आहे.

मोठमोठ्या शहरांतील गृहहीन कामगारांना वाजवी दरांत रात्रीच्या निवाऱ्याच्या सोयी पुरविण्याचा कार्यक्रम विशेष महत्त्वाचा आहे. याचा दुहेरी फायदा होतो. एक तर कामगारांना रात्रीं निवारा मिळतो आणि दुसरें म्हणजे गृहहीन लोकांची गुन्हेगारीकडे वळण्याची प्रवृत्ति कमी होते.

सामूहिक सहकारी कार्यक्रमांबाबत सल्ला देण्यासाठी बरेच वर्षांपासून राष्ट्रीय सल्लागार समिति स्थापण्यांत आली आहे. विकास कार्यक्रमांत लोकांचें सहकार्य व या विषयाशीं संबंधित अशा समस्या कशा सोडवाव्या याबाबत विचारविनिमय घडवून आणण्याची कामगिरी या समितीकडे आहे. कस्तुरबा गांधी स्मारक विश्वस्त निधि, हरिजन सेवक संघ, गांधी स्मारक निधि, भारत सेवक समाज, भारतीय समाज सेवा परिषद् व भारतीय बालकल्याण मंडळ अशा संस्थांचे प्रतिनिधि या समितीमध्यें आहेत. पंतप्रधान या समितीचे अध्यक्ष आहेत.

राष्ट्रीय सल्लागार समिति शिफारस करील अशा कार्यक्रमांतून व लोकांचें सहकार्य लाभलेल्या योजनांसाठी तृतीय योजनेंत दहा कोटी रु. राखून ठेवण्यांत आले आहेत. विकास कार्यक्रमांत लोकांचें सहकार्य अधिकाधिक कसें मिळवावें याची प्रात्यक्षिकासहित माहिती देण्यासाठी तृतीय योजनेंत प्रायोगिक योजना व तत्संबंधित संशोधन हातीं घेतलीं जातील.

---

**महागाई भत्त्यांत वाढ**—उत्तर प्रदेश सरकारनें आपल्या नोकरांच्या महागाई भत्त्यांत वाढ करावयाचें ठरविलें आहे. ज्या नोकरांचा पगार मासिक ४५० रुपयांपर्यंत असेल त्यांचाच भत्ता वाढविण्यांत येणार आहे. किती पगाराला किती महागाईभत्ता वाढवावा ह्यासंबंधीं कोष्टक तयार करण्यांत आलें असून तें एक एप्रिल १९६० पासून अंमलांत येईल.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९१८]　　गिरगांव, मुंबई ४.　　[टेलि. : ७०१४

**महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. | ८,५९,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. | ९,७३,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. | २,३२,००,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. | २,६७,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.

विभागांची शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें १.

**१०, बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें १**

विद्यालयाचा पुढील शिक्षणक्रम दि. १ ऑक्टोबर १९६० रोजीं सुरू होईल. विद्यालयांत सुपरवायझर, बँक-इन्स्पेक्टर, असिस्टंट डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, सब-ऑडिटर, खरेदी-विक्री संघ, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी व इतर मोठ्या सहकारी संस्थांचे सेक्रेटरी आणि ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केटकमिटी या दर्जाचा नोकरवर्ग यांना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम सहा महिने मुदतीचा आहे.

**पात्रता :—**

(१) उमेद्वार एस. एस. सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असला पाहिजे.

(२) सहकारी संस्थेचा उमेद्वार एस. एस. सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्यांस सहकारी संस्थेंतील नोकरीचा किमान तीन वर्षांचा अनुभव असल्यास व तो इंग्रजी १० वी, व्हर्नाक्युलर फायनल किंवा सेक्रेटरी शिक्षणवर्ग परीक्षा पास असल्यास त्यांस प्रवेश मिळूं शकेल.

(३) वरील पात्रता असणाऱ्या स्त्री-उमेद्वारांनाहि प्रवेश मिळूं शकेल.

(४) सहकारी खातें, सहकारी संस्था व ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिट्यांच्या उमेद्वारांना विद्यावेतनासहित व इतरांना खाजगी विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्यांत येतो. विद्यावेतनासहित प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन दरमहा रु. ४० व प्रवासभत्त्यासाठी सबंध शिक्षणक्रमाकरितां रु. ६० देण्यांत येतात. खाजगी विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमाची फी रु. ४० प्रवेश मिळतांच ताबडतोब विद्यालयांत भरावी लागते व विद्यालयानें ठरविलेल्या प्रवासाचा खर्चहि स्वत: करावा लागतो.

**प्रवेश-अर्ज पाठविण्याची रीत :—**

(१) सहकारी संस्थांत नोकरी करणाऱ्या उमेद्वारांनीं आपल्या संस्थेच्या ठरावाच्या नकलांसह प्रवेश-अर्ज, आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा सहकारी बोर्डाकडे दिनांक २० ऑगस्ट १९६० पूर्वी पाठवावेत.

(२) खाजगी उमेद्वारांनीं देखील आपले अर्ज त्या त्या जिल्हा सहकारी बोर्डाकडे दि. २० ऑगस्ट १९६० पूर्वी पाठवावेत.

(३) परस्पर विद्यालयाकडे आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाहीं.

**अर्ज मागविण्यासंबंधीं :—**

विद्यालयाचे प्रवेश-अर्ज व माहितिपत्रकें यांची किंमत ५० नये पैसे आहे. फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत व जिल्हा सहकारी बोर्डाचे कचेरींत सुट्टीचे दिवसांखेरीज रोज ११ ते ६ व शनिवारीं सकाळीं ८ ते ११-३० या वेळांत मिळूं शकतील. अर्जाची मागणी करतेवेळीं ५० न. पैसे रोख भरणें किंवा ५० न. पैश्यांचीं पोष्टाचीं तिकिटें पाठविणें आवश्यक आहे. अर्ज पोष्टानें मागविणें असल्यास पोस्टेजसाठी १५ नया पैश्यांचीं जादा तिकिटें पाठवावींत. जिल्हा सहकारी बोर्डांचे पत्ते पुढीलप्रमाणें आहेत :—

(१) पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि., १४८७, शुक्रवार पेठ, पुणें २, (२) ठाणें जिल्हा सहकारी बोर्ड लि., शिवाजी चौक, कल्याण, (३) कुलाबा जिल्हा सहकारी बोर्ड लि., बाजार पेठ, पेण, (४) सोलापूर जिल्हा सहकारी बोर्ड लि., द्वारा सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर.

पुणें, ठाणें, कुलाबा व सोलापूर या जिल्ह्यांतून येणाऱ्या उमेद्वारांनाच फक्त या विद्यालयांत प्रवेश मिळूं शकेल.

प्र. म. बोपशेट्टी,
प्रिन्सिपॉल.

### इंजिनिअर पवार ह्यांचा मृत्यु

सुप्रसिद्ध इंजिनिअर व कॉन्ट्रॅक्टर श्री. न गं. पवार, बी. ए., बी. ई., (बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे व्हाइस चेअरमन) ह्यांस सोमवारीं पहाटे देवाज्ञा झाली, हें नमूद करण्यास दु:ख होतें. श्री. पवार हे "अर्था" चे पहिल्या अंकापासून ग्राहक होते, इतकेंच नव्हे तर पहिल्या अनुक्रमाचे वर्गणीदार होते.

**इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशन**—इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशननें आपल्या नोकरवर्गाच्या मूळ पगारांत १० टक्के आणि महागाई भत्त्यांत २५ टक्के वाढ करण्याचें ठरविलें आहे. योजनेचा कॉर्पोरेशनचा कामगार-संघ विचार करीत आहे. ती अमलांत आल्यास ९,००० नोकरांना तिचा फायदा मिळेल.

**स्टॅनव्हॅक कंपनीची तेलखरेदी**—भारतामधील स्टॅनव्हॅक तेल कंपनी युगोस्लाव्हिआकडून वंगणाचें तेल आयात करीत आहे. तेलाची किंमत रुपयाच्या चलनांत द्यावयाची असल्यानें भारताच्या परदेशीय चलनाची बरीच बचत होईल. युगोस्लाव्हिआकडून तेलाची आयात करणारी भारतामधील ही पहिलीच कंपनी आहे.

**भारतामधील लोकांचा आहार**—भारतामधील लोकांच्या आहारांत सुधारणा व्हावयाची असेल तर फक्त अन्नधान्याच्या उत्पादनांत वाढ करून भागणार नाहीं, असें मत संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या आहारविषयक तज्ज्ञांनीं व्यक्त केलें आहे. दूधदुभत्याचे पदार्थ, अंडीं, मासे, फळें, इत्यादि खाद्यवस्तूंच्या उत्पादनांतहि वाढ व्हावी लागेल असें त्यांनीं सांगितलें.

**रेल्वे इस्पितळांत तैलचित्रें**—पश्चिम रेल्वेनें आपल्या मुंबई येथील इस्पितळांत तैलचित्रें लावण्याचें ठरविलें आहे. ह्या उपक्रमाला रेल्वेबोर्डाकडून मान्यता मिळालेली आहे. इस्पितळांतील वातावरण रोग्यांच्या दृष्टीनें अधिक आनंदमय करण्यास तैलचित्रांचा उपयोग होईल असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**हिवाळ्यासाठी भत्ता**—काश्मीरमध्यें श्रीनगरला काम करणाऱ्या नॉन गॅझेटेड सरकारी नोकरांना हिवाळ्यासाठी स्वतंत्र भत्ता देण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. भत्त्याची रक्कम दरमहा १० ते २५ रुपयांपर्यंत आहे आणि तो फक्त ५ च महिने देण्यांत येईल. ह्या सवलतीचा फायदा ६०० नोकरांना मिळेल.


प्रियजनांना द्यावयाची भेट कशी असावी ?

**सतत नवा आनंद देत राहणारी !**

श्री. वा. काळे ह्यांचें अवीट साहित्य

| | |
|---|---|
| कण आणि क्षण | रु. १=५० |
| पुढें पाऊल | रु. १=०० |
| तुमचें स्थान कोणतें ? | रु. १=०० |

ही भेट देऊन आपली गुणज्ञता व्यक्त करा.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ६१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.